# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१.**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट ३७३-२२** **दिनांक ०५/१२/२०२२**

## लॉजच्या नावाखाली वेश्या व्यवसाय चालविणाऱ्या इसमांवर पोलीस उप आयुक्तांची कारवाई.

दिनांक ३/१२/०१२ पोलीस उप आयुक्त श्री जयंत बजबळे यांना बातमीदाराकडून बातमी मिळाली की, इना पॅलेस (कॅपीटल) लॉजींगमध्ये येणाऱ्या पुरुष ग्राहकांना पैशाच्या मोबदल्यात वेश्यागमनासाठी महिला पुरविल्या जातात. मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने पोलीस उप आयुक्तांच्या मार्गदशनाखाली पोलीस निरीक्षक टिळेकर व पथकाने दिनांक ३/१२/२०२२ रोजी सदर ठिकाणी सायंकाळी १७:३० वाजताचे सुमारास कायदेशीर बाबींची पुर्तता करुन छापा कारवाई केली असता हॉटेल इना पॅलेस येथील मॅनेजर व वेटर हे लॉजच्या माध्यमातून पिडीत महिलांशी संपर्क साधून त्यांना लॉजमध्ये बोलावून घेवून लॉजींगमध्ये येणाऱ्या पुरुष ग्राहकांना पैशाच्या मोबादल्यात वेश्यागमनासाठी महिला पुरवित असल्याचे आढळून आल्याने कारवाई दरम्यान ५ महिलांची सुटका करण्यात आली आहे. तसेच सदर लॉजचा मालक, मॅनेजर, वेटर अशा ६ आरोपींविरुध्द नवघर पोलीस ठाणे येथे I गुरनं ९३४/२०२२ भादंवि ३७०(१)(३), ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम चे कलम ३, ४, ५, ६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी श्री जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. सागर टिळेकर, पोना रामनाथ शिंदे, मसुब शिवानी ठाकरे सर्व नेम- भाईंदर पोलीस ठाणे तसेच सपोनि श्री डी आर लोंढे, सफौ. अजय मांडोळे, पोहवा. संतोष क्षिरसागर, विनोद चव्हाण, मपोहवा विजेता नाईक सर्व नेम- पोलीस उपआयुक्त परिमंडळ-१ कार्यालय यांनी केलेली आहे.

---ooo---